ये.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A | N.C.R.B. | I.I.F.-1. 06

# पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. FIR No. २८ वर्ष Year २०१८ दिनांक Date ०४/०८/२०१८

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलमे Sections ७, १३(१)(ड) सह १३(२)
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections : ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........ तारीख पासून ०१/८/१८ वेळ ........ तारीख पर्यंत ०४/८/१८ वेळ ........
   Occurence of offence : Day Date from Time Date to Time

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)

3. (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date ०१/०८/२०१८ वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. २८/२०१८ तारीख Date ०४/०८/१८ वेळ Time १३.३५ वा.

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name अंधेरी म.न.पा. "के" पश्चिम विभाग, मुंबई ६ वा मजला ठिकाणाचे नंबर No. ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........

   जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

   (a) नाव Name जावेद शेख (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name मकबुल शेख

   (c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age १८/१०/१९८२ (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9773633677

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी

   (g) धर्म Religion मुस्लीम जात Caste हाजी मेमन जनजात Sub-Caste ........

   (h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward १५, मंसुरी मेन्शन, ३५ वा रस्ता, बांद्रा पश्चिम मुंबई ५० नाव/नंबर House/Name No. ........ फोन/मो. नंबर Phone/M. No. ........ पॅन नं. Pan No. ........ व्होटर्स नं. Card No. ........

   रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो.स्टे P. Stn. ........

   तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

   किरणसिंह अशोकसिंह पाटील हि.वय ३८ वर्षे धंदा नोकरी दुय्यम अभियंता "के" पश्चिम, म.न.पा. विभाग, रा.ठी. कशीस पार्क, ७ए.७बी. बिल्डींग, रुम नं ३२, ७ वा मजला, मुलुंड चेक नाका जवळ ठाणे (प)

फिर्याद

फिर्यादी श्री जावेद मकबुल शेख, वय ३८ वर्षे, धंदा नोकरी रा.ठी. १५ मन्सुरी मेन्शन ३५ वा रस्ता बांद्रा (पश्चिम) मुंबई ५०. यांचा सविस्तर जबाब संगणकावर टंकलिखित करून त्याची प्रिंट आऊट काढून स्वतंत्रपणे जोडण्यात आला आहे. तीच गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात येत आहे.

समक्ष

D'mello
4/8/18

(सि. बि. डिमेलो)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

Javed Shaikh
04/08/2018

8) तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

...... २,००,०००/- रुपये

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... २,००,०००/- रुपये
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) २,००,०००/- रुपये

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पा... जोडावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी किरणसिंह अशोकसिंह पाटील, दुय्यम अभियंता "के" पश्चिम म.न.पा. मुंबई यांनी फि. यांचा मावस भाऊ रा.ठी जोगेश्वरी (प) मुं यांनी त्यांचे राहते निवासस्थानामध्ये केलेले दुरुस्तीचे काम अनाधिकृत असल्या बाबत म.न.पा. विभागाकडुन नोटीस पाठवुन त्याच्या वर कायदेशीर कारवाई न करण्यासाठि रु ८,००,०००/- लाचेची मागणी करुन त्यापैकी रु २,००,०००/- दि ३०।७।१८ रोजी स्विकारले फिर्यादी यांनी केलेल्या तक्रारी संदर्भात दि ३।८।१८ रोजीचा पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी यांनी उर्वरील लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन दि ४।८।१८ रोजी रु २,००,०००/- कायदेशीर परिश्रम खेरीज परितोषण म्हणुन लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) भा. प्र. अधि. अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ...... श्री. बि. डिमेलो, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ......

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ...... Rank ...... No. ......
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ...... (3) Transferred to P. S. ......
District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

[signature] 4/8/18

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name श्री. बि. डिमेलो
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई
Coding No. of I. O. ......

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

(के)

फिर्याद दिनांक ०४/०८/२०१८.

श्री. जावेद मकबुल शेख, वय– ३८ वर्षे, व्यवसाय– नोकरी (हीना मोटर्स, अकाउंटस व पत्रव्यवहाराचे काम ), राहण्याचे ठिकाण– १५, मन्सुरी मेन्शन, ३५ वा रस्ता, बांद्रा पश्चिम, मुंबई ४०००५०. मो.क्र. ९७७३६३३६७७.

०००

मी वरील प्रमाणे असून वर नमूद पत्यावर मागील ०२ वर्षापासुन माझी पत्नी सौ. शंमो शेख वय ४० वर्षे, धंदा नोकरी, मुलगा अफान शेख, वय १४ वर्षे धंदा शिक्षण, मला दोन जुळया मुली असुन त्यांची नावे मुलगी अन्नी शेख वय ०७ वर्षे, धंदा शिक्षण, मुलगी अलीना शेख, वय ०७ वर्षे, यांच्यासह भाडेतत्वावर रहावयास आहे. माझ्या नातेवाईकाची हीना मोटर्स या नावाची कंपनी असुन, त्याचे कार्यालय हे ४०५, सवई चेंबर, लिंक रोड, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई ४०० ०५४ या ठिकाणी आहे. या कंपनीत मी गेल्या ०५ वर्षापासून अकाउंटस व पत्रव्यवहाराचे काम पाहातो. नमुद कंपनी ही जुन्या मोटार कार खरेदी करुन, त्याची दुरुस्ती करुन विक्री करण्याचा व्यवसाय करते.

माझा मावस भाऊ श्री मुस्ताक उस्मान चश्मावाला, वय ४५ वर्षे धंदा:– व्यवसाय, रा.ठी ७०३, ७ वा मजला फरहात अपार्टमेन्ट, सहकार रोड, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई ४००१०२.येथे त्याचे कुटुंबासह रहावयास आहे. त्याचे मुंबईत अब्दुल रेहमान स्ट्रीट येथे मुलांची खेळणी विकण्याचे घावूक दुकान आहे. माहे मे २०१८ मध्ये तो माझ्या घरी आला होता त्यावेळी त्याने मला सांगीतले की, त्याने त्याच्या वर नमुद रहाते फ्लॅटमध्ये दुरुस्तीचे काम केलेले आहे. त्याबाबत दोन दिवसांपुर्वी बृहन्मुंबई महानगर पालीकेचे '' के'' पश्चिम, विभागाचे दुय्यम अभियंता श्री. किरणसिंह पाटील यांनी त्याच्या घरी येवून, केलेले फ्लॅटचे काम अनधिकृत असून, त्याबाबत तक्रार आलेली आहे. असे सांगुन त्यांनी मला कार्यालयात येवून भेटण्यास सांगीतल्याचे सांगुन, श्री. किरणसिंह पाटील यांना त्यांचे कार्यालयात भेटण्याकरीता विनंती केली.

मी मावस भावाच्या विनंतीनुसार दिनांक ३१/०५/२०१८ रोजी अंधेरी पश्चिम मुंबई येथील म.न.पा. के/पश्चिम कार्यालयात जावुन दुय्यम अभियंता श्री. किरणसिंह पाटील यांची भेट घेतली. दुय्यम अभियता श्री. किरणसिंह पाटील यांनी माझ्या भावाच्या नावे काढलेली नोटीस क्र KW/DO1KW/064/354A-MMC ACT/KW647No1/26-05-2018, dated 26/05/2018 ही मला स्विकारण्यास सांगुन, ती माझ्याकडे दिली. व नोटी दिल्याची पोच म्हणुन माझी नोटीसच्या दुय्यम प्रतीवर स्वाक्षरी घेतली. सदर नोटीस मी माझ्या मावस भावास त्याचे घरी जावुन दिली. मावस भाऊ मुस्ताक यांने वकील श्री. राजेश यादव यांच्या मार्फतीने सदर नोटीसला दिनांक ०२/०६/२०१८ रोजी उत्तर तयार करून माझ्या कडे दिले. सदर उत्तराची प्रत मी स्वत: दिनांक ०२/०६/२०१८ रोजी मनपा कार्यालयाचे के/पश्चिम वॉर्ड येथे जावुन टपाल कार्यालयात दिली व त्याची पोच घेतली.

त्यानंतर काही दिवसांनी मनपाच्या अनोळखी कर्मचाऱ्याने माझ्या मावस भावाच्या घरी येवून, दुय्यम अभियंता श्री. किरणसिंह पाटील यांची भेट घेण्यास सांगीतले. सदर बाब भावाने मला प्रत्यक्ष भेटुन सांगितली व संबधीत दुय्यम अभियता किरणसिंह पाओील यांची भेट घेण्यास सांगितली. मावस भावाच्या सांगण्याप्रमाणे मी दिनांक ०७ किंवा ०८/०६/२०१८ रोजी पुन्हा म.न.पा. के/पश्चिम कार्यालयात जावुन त्यांची भेट घेतली. श्री. किरणसिंह पाटील यांनी मला ''काय झाले, नोटीसला उत्तर दिले नाही.'' अशी विचारणा केली असता, मी त्यांना नोटीसला वकीलामार्फतीने लेखी उत्तर मनपा कार्यालयात दिले असल्याचे सांगीतले. दुय्यम अभियंता किरणसिह पाटील यांनी अद्याप उत्तर मिळाले नसल्याचे सांगितले. मी मावस भाऊ मुस्ताक यास संपर्क करून सदरची माहिती दिली. त्यावर त्यांनी वकिला कडुन पुन्हा त्याच दिवशी दिनांक ०८/०६/२०१८ रोजी लेखी उत्तर तयार करुन ती मनपा कार्यालयाकडे देण्यास मला सांगीतले. त्याप्रमाणे सदर लेखी उत्तराची प्रत मी दिनांक १२/०६/२०१८ रोजी मनपा कार्यालयाचे के/पश्चिम वॉर्ड अंधेरी पश्चिम येथील टपाल कार्यालयात देवून त्याची पोच घेतली.

समक्ष
[signature] 4/8/18
( सी.बी. डिमेलो)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Javed Shaikh
04/08/18

त्यानंतर दिनांक २८/०७/२०१८ रोजी कोणीतरी माझ्या मावस भावाच्या फ्लॅटचे दरवाजावर मनपा कार्यालयाची नोटीस क्र DO-I/AEBT/KW/488/120/64, DATED; 28/07/2018 U/S 488 OF MMC ACT. नोटीस चिकटवण्यात आली असल्याची भावानी पाहीली. त्यात अनधिकृत बांधकाम हे दि. ३०/०७/२०१८ रोजी १०.३० वा. किंवा त्यानंतर कधीही तोडण्यात येईल असा मजकुर लिहीण्यात आलेला होता. त्याबाबत माझ्या मावस भावाने मला प्रत्यक्ष भेटून कळविले. मी पुन्हा दिनांक २८/०७/२०१८ म.न.पा. के/पश्चिम कार्यालय येथे जावुन दुय्यम अभियंता श्री. किरणसिंह पाटील यांची भेट घेतली असता, श्री. किरणसिंह पाटील यांनी रागाने माझ्यावर ओरडून मला "तुने बीएमसी के नोटीस को क्या समझा है, तुम तो नोटीस को फाटे पे मार रहे हो " असे बोलले त्यावर मी त्यांना आपल्या नोटीसला वकीलामार्फत लेखी उत्तर दिले असल्याचे सांगीतल्यावर श्री. किरणसिंह पाटील यांनी मला "ॲडव्होकेट के रिप्लॉयसे क्या होता है, क्या करोगे, कोर्टसे स्टे लेकर आओगे, फिर क्या, कोर्ट भी हमारा ही गर्व्हमेंट डिपमिंट है, हमारे फेवर मे ऑर्डर देगी, डिमोलेशन तो होकर रहेगा, क्या मतलब है, टाईम खिचने का." असे बोलुन मला त्यांच्या बाजुच्या खुर्चीवर बसण्यास सांगितले. मी खुर्चीवर बसल्या नंतर त्यांनी मला " नोटीस के उत्तर से कुच नही होगा, आपको ऐ मिटानाही पडेगा" असे बोलुन एका कागदावर १० आकडा लिहुन दाखवला व "इतना करवा दो डिमोलेशन नही होगा," यावर मी त्यांना भावाशी बोलून सांगतो. असे सांगितले असता, श्री. पाटील यांनी मला भावाशी लागलीच संपर्क करण्यास सांगीतले. "अन्यथा सोमवार तक डिमोलेशन करना पडेगा" असे सांगीतले. त्यावर मी त्यांना हे अशक्य असल्याचे सांगीतले. तेव्हा श्री. किरणसिंह पाटील यांनी, "तुमच्या घराच्या पाठीमागे झोपडपट्टीत गेलो होतो, तिथे झोपडीवाल्याने दोन लाखाची ऑफर दिली होती, परंतू मी त्याला नकार दिला व ऑफीसला येवून भेटण्यास सांगीतले होते. " अगर तुम्हारा डिमोलेशन किया जायेगा तो कितना नुकसान होगा मालुम है क्या" असे बोलुन त्यांनी कागदावर ४०—५० लाख असा आकडा लिहून दाखविला. व त्यांनी मला प्लॅन कॉपी पाहीली आहे का? असे विचारून, " भाई के साथ बात करलो, फायनली इतनेमे खतम करो" असे बोलून त्यांनी कागदावर ८ हा आकडा लिहीला व आठ लाख बरोबर आहेत मी जास्त काही मागत नाही. माझे एकटयाचे पैसे नाहीत पोलीस व दुसरा स्टाफ असे सर्वांना मॅनेज करावे लागेल. असे सांगून त्यांनी त्यांचा मोबाईल क्र ९९८७५५४४२२ दिला. व मोबाईलवर पैशा बाबत काहीऐक बोलायचे नाही असे मला बजावुन सांगितले.

दिनांक २९/०७/२०१८ रोजी मी श्री. किरणसिंह पाटील यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क करुन पैशाची व्यवस्था करण्याकरीता वेळ मागीतली असता. त्यांनी त्यास नकार दिला व उद्या कोणीतरी जबाबदार व्यक्ती किंवा स्वत: मालकाना भेटण्यास सांगीतले. दिनांक ३०/०७/२०१८ रोजी मी स्वत: एका लिफाफ्यात दोन लाखाची रक्कम घेवून श्री. किरणसिंह पाटील यांना भेटण्याकरीता त्यांचे कार्यालयात गेलो. श्री. किरणसिंह पाटील यांनी मला त्यांचे कार्यालयाचे मागील बाजुस असलेल्या गच्चीवर नेले व काय झाले असे विचारले. मी त्यांना त्यांनी मागीतलेली रक्कम मोठी असून, त्याची व्यवस्था करण्यास वेळ लागेल असे सांगताच त्यांनी आत्ता किती रक्कम आणली आहेस असे विचारले. त्यावर मी त्यांना दोन लाख आणल्याचे संगीतले. श्री किरणसिंह पाटील यांनी बाकीच्या रक्कमेची कधी व्यवस्था होईल, असे विचारले त्यावर मी त्यांना एक हप्ता लागेल असे सांगीतले. त्यांनी नेमके कधी असे विचारले असता, मी गुरवार पर्यंत दोन लाख व शनिवारी ४ लाख असे देण्याचे मान्य केले. त्यानंतर श्री. किरणसिंह पाटील यांनी मला गच्चीच्या दुसऱ्या बाजुस असलेल्या कोपऱ्यात नेवून "यहा दे दो" असे सांगीतल्यावर मी दोन लाखाची रक्कम असलेले पाकीट त्यांचे हातात दिले. त्यावर श्री. किरणसिंह पाटील यांनी मोबाईल फोनवर बोलतांना रकमेचा उच्चार करायचा नाही असे मला पुन्हा बजावून सांगुन, पुढच्यावेळी पैसे घेवून परस्पर भेटण्याची सूचना दिली आणि गच्चीच्या दुसऱ्या बाजुस असलेल्या दरवाजाने जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी तेथून निघुन गेलो.

Javed Shaikh
04/08/18

समक्ष
4/8/18
( सी.बी.डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

श्री. किरणसिंह पाटील, दुय्यम अभियंता यांनी माझेकडे मागणि केलेल्या ८ लाख रुपयांच्या लाचेच्या रक्कमे पैकी २ लाख रुपये मी त्यांना दिनांक ३०/०७/२०१८ रोजी दिलेले असून, त्यांना मला अधिक लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. ०१/०८/२०१८ रोजी दुपारी १५.०० वा. दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, मुंबई येथे जावुन लेखी तक्रार अर्ज दिला होता. मी दिलेल्या तक्रारअर्जा वरून सपोआ श्री शिवाजी माने व पो.नि. श्री सी.बी. डिमेलो, यांनी तात्काळ दोन पंच बोलावून त्यांची माझ्याशी ओळख करुन दिली व त्यांना मी दिलेला तक्रार अर्ज वाचून दाखवला व त्यांना वाचण्यास दिला. त्यानंतर पो.नि डिमेलो यांनी माझ्या लेखी तक्रार अर्जावर समक्ष म्हणुन स्वाक्षरी करून त्यावर पंचाच्या सहया घेतल्या व सदरचा लेखी तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात घेतला. पो.नि. डिमेलो यांनी लोकसेवकाने दि. ०२/०८/२०१८ रोजी भेटण्यासाठी बोलविले असल्याने मला तसेच पंचाना दिनांक ०२/०८/२०१८ रोजी सकाळी ०९.०० वाजेच्या सुमारास कार्यालयात येण्यास सांगुन प्राप्त तक्रारी बाबत कोणाकडेही काहीही न सांगण्याच्या सर्वांना सूचना दिल्या.

मी दिलेल्या सुचने प्रमाणे दिनांक ०२/०८/२०१८ रोजी ला.प्र.विभाग कार्यालयात हजर झालो. सपोआ श्री शिवाजी माने व पो.नि. श्री. डिमेलो यांचे सूचनेनुसार मी लोकसेवक श्री. किरणसिंह पाटील यांना त्यांचे मोबाईलवर अंदाजे १२.२१ वा. संपर्क केला असता लोकसेवक किरणसिंह पाटील यांनी मला मी नंतर फोन करतो असे सांगीतले. त्याप्रमाणे आम्ही ला.प्र.विभाग कार्यालयात थांबुन राहीलो. लोकसेवक श्री किरणसिंह पाटील यांनी मला माझ्या मोबाईलवर अंदाजे १६.१० वा. संपर्क केला. सदरचा कॉल पो.नि. श्री डिमेलो यांचे सूचनेनुसार मी उचलला नाही. त्यानंतर पो.नि. श्री. डिमेलो यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, मला माझा मोबाईल वरून, मोबाईलचा स्पिकर चालु करून लोकसेवक श्री. किरणसिंह पाटील यांना संपर्क करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी लोकसेवकाचे मोबाईलवर संपर्क केला. लोकसेवक श्री. किरणसिंह पाटील यांनी मला १७.१५ वा. त्यांचे कार्यालयात येण्यास सांगितले. त्याप्रमाणे सपोआ श्री शिवाजी माने, पो.नि. श्री डिमेलो यांनी लोकसेवकाच्या लाचेच्या मागणीबाबत पंचा समक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. मी पडताळणी पथक व दोन पंचासह सरकारी वाहन क्रं. एमएच—०४—एन—३६०८ या मध्ये बसुन लोकसेवकाच्या कार्यालयाकडे निघालो. पडताळणी पथकासह आम्ही एस.व्ही रोड येथे अंदाजे १७.१० वा पोहचलो. पो.नि. श्री डिमेलो यांनी पंच श्री हेंमत परब व मला पडताळणी बाबतच्या सूचना देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टाच्या आतील भागास बनीयनला लावुन पंचासमवेत लोकसेवक यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आले ती वेळ सुमारे १७.२७ वा. ची होती. मी पंचासह लोकसेवक यांचे कार्यालयात जावुन लोकसेवक श्री किरणसिंह पाटील यांची भेट घेतली. लोकसेवक श्री. किरणसिंह पाटील यांनी माझ्याकडे उर्वरीत ६ लाख रक्कमेची दोन हप्त्यात मागणी करून, त्यापैकी दुसरा हप्ता रुपये २ लाखाची रक्कम घेवून, दिनांक ०३/०८/२०१८ रोजी सकाळी १०:०० वाजेपर्यंत त्यांचे कार्यालयात फोन करुन येण्याबाबत सांगीतले. त्यानंतर आम्ही सर्व पथक पुन्हा ला.प्र.विभाग कार्यालयात परत आलो. त्यानंतर मी माझ्या जवळील रू. २ लाख ( पाचशे रूपये दराच्या ४०० भारतीय चलनी नोटा) लाचेची रक्कम म्हणून वापरण्या करीता पो.नि. श्री डिमेलो यांच्या ताब्यात दिले. व त्यानी सदर नोटाच्या छायांकित प्रती काढुन घेतल्या. व विलंब टाळण्याकरीता दिनांक ०३/०८/२०१८ रोजीच्या सापळा कारवाईकरीता मला परस्पर एस.व्ही रोड, अंधेरी येथे येण्याच्या तसेच याबाबत गोपनियता पाळण्याबाबत सूचना दिल्या.

दिनांक ०३/०८/२०१८ रोजी ट्राफीकमध्ये अडकल्याने मी एस.व्ही.रोड. अंधेरी पश्चिम येथे ठरलेल्या ठिकाणी सकाळी सुमारे १०.५० वा पोहचलो. तेथे सपोआ श्री शिवाजी माने, पो.नि. श्री डिमेलो हे पंच व पोलीस पथक सरकारी वाहन क्र एमएच—०४—एन—३५०३ सह हजर होते. पो. नि. श्री डिमेलो यांच्या सूचनेनुसार मी माझ्या मोबाई क्रं. ९७७३६३३६७७ वरून लोकसेवक श्री. किरणसिंह पाटील यांच्या मोबाईल क्र ९९८७५५४४२२ वर संपर्क साधला असता, लोकसेवक यांनी

समक्ष
[signature] 4/8/18
( सी.बी.डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

[signature] 04/08/18

नंतर फोन करतो असे सांगीतले. आम्ही सर्वजण सदर ठिकाणी लोकसेवकाच्या फोनची वाट पाहात थांबलो. सुमारे १८:१५ वाजेपर्यंत लोकसेवकाचा कोणताही फोन न आल्याने,व फोन येण्याची शक्यता वाटत नसल्याने ला.प्र.वि. कार्यालियात परत जाण्याचे असे सांगुन दिनांक ०४/०८/२०१८ रोजी सकाळी ०९:४५ वा पुन्हा सापळा कारवाई आजमावण्या करीता परत सदर ठिकाणी हजर होण्याचे सांगून, पंच व सापळा पथकास दिनांक ०४/०८/२०१८ रोजी सकाळी ०८.३० वा. ला. प्र.विभाग कार्यालयात हजर राहाण्याच्या तसेच विलंब टाळण्याकरीता मला परस्पर एस.व्ही रोड, अंधेरी येथे येण्याच्या सूचना दिल्या.

आज दिनांक ०४/०८/२०१८ रोजी ठरल्याप्रमाणे मी सकाळी ०९.३० वा. दरम्यान एस. व्ही रोड येथे येवून सपोआ श्री शिवाजी माने, पो.नि. श्री डिमेलो व सापळा कारवाई पथक यांची भेट घेतली. पो.नि. श्री डिमलो यांनी आज रोजी पुन्हा लोकसेवकाला फोन करुन सापळा कारवाई आजमावण्यात येईल असे सांगुन, मला लोकसेवकास फोन करण्याची सूचना दिली. त्याप्रमाणे मी लोकसेवक श्री किरणसिंह पाटील यांना त्यांचे मोबाईवर संपर्क केला. परंतू लोकसेवकाशी माझा संपर्क झाला नाही. त्यावेळी सपोआ श्री शिवाजी माने व पो.नि. श्री डिमेलो यांनी चर्चेअंती लोकसेवकाची मी पंचासह लोकसेवकाच्या कार्यालयात जावुन लोकसेवक किरणसिंह पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेण्याचे ठरले. सपोआ श्री शिवाजी माने यांच्या सूचने प्रमाणे सदर ठिकणी पंचाना व मला अँथ्रॉसिन पावडरचे गुणधर्म सांगून, प्रात्यक्षिक करुन समाजावून सांगितले. त्यानंतर ठरल्या प्रमाणे सदरची अँथ्रॉसिन पावडर सरकारी वाहनाचे चालक श्री. महारनुर यांनी लाचेच्या २ लाख रक्मेच्या नोटाना लावली. सदरची अँथ्रॉसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम पोपटी रंगाच्या दोन लिफाफ्यात ठेवून ते लिफाफे माझ्या जवळील सॅकमध्ये मधल्या कप्प्यात अलगदपणे ठेवले. पो.नि. श्री डिमेलो यांनी श्री. महारनुर हे पुढील सापळा कारवाईत भाग घेण्यार नसल्याचे सांगितले.

सपोआ श्री शिवाजी माने व पो.नि. श्री डिमेलो यांनी सापळा कारवाईत लोकसेवकाने लाच स्विकारल्यानंतर मला डाव्या हाताने माझ्याकडील हातरुमालाने चेहरा पुसण्याची खुण ठरवून दिली. तसेच सापळा कारवाईत कोणी काय करायचे याबाबत सापळा पथकातील पंच व सर्व अंमलदारांना सूचना दिल्या. त्यानंतर पो.नि. श्री डिमेलो यांनी माझ्या शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुमारे १०.५७ वा चालू करून लावला. ठरल्या प्रमाणे मी व पंच क्र १ श्री. हेमंत परब असे लोकसेवक श्री. किरणसिंह पाटील यांचे कार्यालयाकडे लोकसेवकाची भेट घेण्याकरीता निघालो. त्यावेळी सापळा पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारही विखुरलेल्या अवस्थेत लोकसेवकाचे कार्यालयाकडे आमचे मागेमाग काही अंतर राखुन निघाले. सापळा पथकाने कार्यालयाच्या अवती भवती सापळा लावला.

श्री. किरणसिह पाटील, दुय्यम अभियंता, (इमारत व कारखाने), यांचे कार्यालय हे बृहन्मुंबई के पश्चिम विभाग, या इमारतीत ६ व्या मजल्यावर असल्याने मी व पंच श्री हेमंत परब असे दोघेही लिफ्टने पाचव्या मजल्यापर्यंत पोहचलो. त्यापुढे लिफ्टची सोय नसल्याने जीन्यावरून पायी ६ व्या मजल्यावर पोहचलो. जिन्याच्या समोर असलेल्या लोखंडी स्लाईडींग दरवाजा बंद असल्याने, तेथे उपस्थित असलेल्या सिक्युरीटी गार्ड यांना मी श्री. किरणसिंह पाटील साहेब आहेत काय? त्यांना मला भेटायचे आहे. असे सांगितले. सिक्युरीडी गार्ड यांनी मला श्री किरणसिंह पाटील साहेबांना फोन लावण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी श्री. किरणसिंह पाटील यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क केला असता संपर्क झाला नाही. त्यामुळे मी परत सिक्युरीटी गार्ड यांना श्री. किरणसिंह पाटील साहेबांचा फोन बंद असून, त्यांच्या कार्यालयात जावून मी आल्याबाबतचा निरोप देण्यास विनंती केली. सिक्युरीटीगार्ड यांनी श्री. किरणसिंह पाटील यांचे कार्यालयात जावून माझा निरोप दिला व परत माझ्याजवळ येवून श्री. किरणहि पाटील सांहेब व्यस्त असल्याने मला थांबण्यास सांगीतले. साधारण २० ते २५ मिनीटानी मी परत सिक्युरीटी गार्ड यांना श्री. किरणसिंह पाटील साहेबांना माझ्याबाबत आठवण करुन देण्यास सांगीतले. त्याप्रमाणे त्यांनी परत श्री. किरणसिंह

समक्ष

Dmello 4/8/18

( सी.बी.डिमेलो )

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Javed Shaikh 04/08/18

पाटील साहेबांना निरोप दिला व परत माझ्याजवळ येवून श्री. किरणसिंह पाटील यांचेसमोर एक स्त्रि व पुरुष कामानिमीत्ताने बसलेले आहेत. त्यांचे काम झाल्यानंतर श्री. किरणसिंह पाटील साहेब बोलावणार असल्याचे मला सांगितले. त्यावेळेस पंच श्री. हेंमत परब हे माझ्याबरोबर. माझ्या मागेच उभे होते. त्यानंतर काही वेळाने एक स्त्रि व पुरुष जिना उतरुन खाली गेल्यानंतर सिक्युरीटी गार्ड यांनी श्री. किरणसिंह पाटील साहेबांना भेटण्यासाठी आत सोडले. परंतु माझ्या सोबत असलेले पंच श्री हेमत परब यांना तेथेच थांबवून ठेवले. त्यामुळे मी एकटाच दरवाजातून आत गेलो व उजवीकडे वळून श्री. किरणसिंह पाटील यांचे कार्यालयासमोर गेलो असता त्यांनी मला हात दाखवून तेथेच थांबण्यास सांगीतले. त्यानंतर श्री. किरणसिंह पाटील हे त्यांच्या कार्यालयातून मागील बाजुने बाहेर पडून माझ्या डाव्या बाजुस आले व त्यांनी मला त्यांच्या मागे येण्याची मानेने इशारा करून सांगितले. मी त्यांचे मागोमाग त्यांचे कार्यालयाच्या मागे असलेल्या गच्चीत आलो. श्री किरणसिंह पाटील यांनी मला नोटीस मागे घेण्याच्या संदर्भात चर्चा करत असताना पैसे देण्याबाबत हाताने इशारा केला. मी माझ्याजवळील सॅकमधील लाचेची रक्कम ठेवलेले दोन लिफाफे माझ्या उजव्या हाताने काढून ते लोकसेवक श्री. किरणसिंह पाटील यांचे कडे दिले. लोकसेवक श्री. किरणसिंह पाटील यांनी लाचेची रक्कम असलेली दोन्ही लिफाफे उजव्या हाताने स्विकारुन ते त्यांनी त्यांच्या अंगावर असलेल्या निळया रंगाच्या टिशर्टच्या आतील बाजुस पोटाजवळ ठेवले. श्री किरणसिंह पाटील यांनी उर्वरीत लाचेची ४ लाख रक्कम ही सोमवार, मंगळवार पर्यत देण्याच्या सूचना देवून मला मी ज्या मार्गाने आत मध्ये आलो त्याच मार्गाने परत जाण्यास इशारा द्वारे सांगितला. त्याप्रमाणे मी त्याच मार्गाने परत कार्यालयाचे बाहेर येवून ठरवून दिल्या प्रमाणे सापळा पथक तसेच पंचाना दिसेल अशा पध्दतीने इशारा केला. दबा धरुन असलेल्या सापळा पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पंचासह श्री. किरणसिंह पाटील यांचे कार्यालयात जावून त्यांना रंगेहात पकडले. त्यावेळी पो.ना. पाटील यांनी श्री किरणसिंह पाटील यांचा उजवा हात पकडला व पंच श्री प्रकाश रहाणे यांनी डावा हात पकडला. पो.नि. श्री डिमेलो यांनी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून, बंद करुन स्वत:चे ताब्यात घेतला. सापळा पथकाने पंचासमक्ष श्री. किरणसिंह पाटील यांची अंगझडती घेवून माझेकडून स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेचे दोन्ही लिफाफे हस्तगत करून ताब्यात घेतले.

श्री किरणसिह पाटील यांनी माझा मावस भाऊ श्री. मुस्ताक चश्मावाला याने त्याचे फ्लॅटमध्ये केलेली अंतर्गत दुरुस्ती ही अनधिकृत असल्याचे सांगुन, सदरचे बांधकाम डिमोलेशन करण्याची नोटीस देवून, नोटीसची कारवाई न करण्याकरीता ८ लाख रूपये लाचेची मागणी करुन, दिनांक ३०/०८/२०१८ रोजी २ लाख रूपये लाचेचा पहिला हप्ता स्विकारून, उर्वरीत ६ लाखा पैकी २ लाखाच्या दुसऱ्या हप्त्याची लाचेची मागणी करून, आज दि. ०४/०८/२०१८ रोजी ११:५५ वाजता स्विकारतांना रंगेहाथ मिळून आला म्हणून माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई होण्याकरीता तक्रार आहे.

श्री किरणसिंह अशोकसिंह पाटील, दुय्यम अभियंता (इमारत व काखाने), म.न.पा. के/पश्चिम वॉर्ड, अंधेरी पुर्व मुंबई. यांचेशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही.

माझा जबाब मराठीत लॅपटॉपवर टंकलिखित केला असून तो मला वाचून दाखवून, हिंदीतून समजावून सांगितला. तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष
4/8/18
( सी.बी.डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Javed Shaikh
04/08/18